भारत सरकार
विधी, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# आठवडी सुट्ट्या अधिनियम, १९४२

(१९४२ चा अधिनियम क्रमांक १८)

[३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान]

# The Weekly Holidays Act, 1942

**(Act No. 18 of 1942)**

[As in force on the 31st August 1995]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले.
१९९६
[किंमत : रु. ]

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान असलेला वीकली हॉलिडेज ॲक्ट, १९४२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ६, अंक ३, दिनांक ७ डिसेंबर १९९५ यात पृष्ठ १२९ ते १३१ मध्ये प्रकाशित करण्यांत आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली :
दिनांक ७ डिसेंबर १९९५

**के. एल. मोहनपुरिया,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Weekly Holidays Act, 1942 as on the 31st August 1995 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the Gazette of India Extraordinary, Part XII, Section 1, No. 3, Vol,6, dated 7th December 1995 on pages 129 to 131.

This Authoritative text was published under the authority of the President under section 2 clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi :
Dated 7th December 1995

K. L. MOHANPURIYA,
Secretary to the Government of India.

# आठवडी सुट्या अधिनियम, १९४२

## कलमांचा क्रम

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. दुकाने बंद ठेवणे.

४. दुकाने, उपाहारगृहे आणि थिएटरे यांमधील आठवडी सुट्या.

५. अतिरिक्त अर्धा दिवस बंद ठेवावयाचे किंवा सुटी द्यावयाची.

६. वेतनात कोणतीही कपात किंवा घट करावयाची नाही.

७. निरीक्षक.

८. निरीक्षकांच्या शक्ती.

९. दंड.

१०. नियम.

११. सूट देण्याची व निलंबित करण्याची शक्ती.

शब्दसूची—इंग्रजी–मराठी
मराठी–इंग्रजी.

# आठवडी सुट्या अधिनियम, १९४२
## (१९४२ चा अधिनियम क्र. १८)[1]

[३ एप्रिल, १९४२]

(३१ ऑगस्ट १९९५ रोजी यथाविद्यमान)

दुकाने, उपाहारगृहे आणि थिएटरे यांमध्ये नोकरीवर ठेवण्यात आलेल्या व्यक्तींना आठवडी सुट्या देण्याबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, दुकाने, उपाहारगृहे आणि थिएटरे यांमध्ये नोकरीवर ठेवण्यात आलेल्या व्यक्तींना आठवडी सुट्या देण्यासाठी उपबंध करणे समयोचित आहे; त्याअर्थी याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास 'आठवडी सुट्या अधिनियम, १९४२' असे म्हणता येईल.

(२) त्याचा विस्तार [2][भाग ख राज्ये खेरीजकरून संपूर्ण भारतभर] आहे.

(३) जर [3][राज्य] शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे तसे निदेशित केले तरच तो त्या [3][राज्यामध्ये] किंवा [3][राज्यातील] एखाद्या विनिर्दिष्ट क्षेत्रामध्ये अंमलात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमामध्ये, विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर,—

(क) "आस्थापना" याचा अर्थ, दुकान, उपाहारगृह किंवा थिएटर, असा आहे ;

(ख) "दिवस" याचा अर्थ, मध्यरात्री पासून सुरू होणारा चोवीस तासांचा कालावधी, असा आहे ;

(ग) "उपाहारगृह" याचा अर्थ, ज्या वास्तूमध्ये लोकांना किंवा एखाद्या लोकवर्गाला जेवण किंवा अल्पोपाहार त्याच ठिकाणी घेण्यासाठी पुरवणे हाच मुख्यतः किंवा पूर्णतः धंदा चालवला जातो अशी कोणतीही वास्तू, असा आहे, पण त्यामध्ये थिएटरला संलग्न असलेल्या उपाहारगृहाचा समावेश होत नाही ;

(घ) "दुकान" यामध्ये, जेथे कोणताही किरकोळ उदीम किंवा धंदा चालवला जातो अशा कोणत्याही वास्तूचा समावेश आहे—त्यात नाभिकाचा किंवा केशभूषाकाराचा धंदा व लिलावाने होणारे किरकोळ विक्रीव्यवहार समाविष्ट आहेत, पण थिएटरच्या ठिकाणी कार्यक्रमपत्रिका, कॅटलॉग यांची जी विक्री होते ती किंवा अन्य तत्सम विक्रीव्यवहार हे त्यातून वगळले आहेत;

(ङ) "थिएटर" यात मुख्यतः किंवा पूर्णतः चलच्चित्रपट, नाट्यप्रयोग किंवा कलामंचावरील करमणुकीचे कार्यक्रम सादर करण्यासाठी योजलेल्या कोणत्याही वास्तूचा समावेश आहे;

(च) "आठवडा" याचा अर्थ, शनिवारी मध्यरात्रीपासून सुरू होणारा सात दिवसांचा कालावधी, असा आहे.

**दुकाने बंद ठेवणे.**

३. (१) प्रत्येक दुकान हे दुकानातील ठळक ठिकाणी कायम लावून ठेवलेल्या नोटिशीमध्ये दुकानदार आठवड्यातील जो दिवस विनिर्दिष्ट करील अशा एका दिवशी पूर्णपणे बंद राहील.

(२) याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेला दिवस दुकानदाराला तीन महिन्यांतून एकदा यापेक्षा अधिक वेळा बदलता येणार नाही.

**दुकाने, उपाहारगृहे आणि थिएटरे यांमधील आठवडी सुट्या.**

४. कोणत्याही दुकानात, उपाहारगृहात किंवा थिएटरात गोप्यविषयक कार्यपदावर नव्हे किंवा व्यवस्थापकीय पदावर नव्हे तर अन्यथा नोकरीला असलेल्या प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक आठवड्यात एका संपूर्ण दिवसाची सुटी देण्यात येईल :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट, जिचा आठवड्यातील नोकरीचा एकूण कालावधी हा अधिकृत रजेमध्ये खर्ची घातलेले दिवस धरून सहा दिवसांपेक्षा कमी आहे अशा व्यक्तीला लागू होणार नाही, किंवा कलम ३ अनुसार ज्या दिवशी दुकान बंद ठेवण्यात आले असेल त्या दिवशी जिला पूर्ण दिवस सुटी देण्यात आली असेल ती व्यक्ती जादा सुटीस हक्कदार होणार नाही.

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १९४१, भाग पाच, पृ. १४२ आणि प्रवर समितीच्या अहवालासाठी पहा, गॅझेट ऑफ इंडिया, १९४२, भाग पाच, पृ. ५५.

२. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ आणि अनुसूचीद्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" याऐवजी घालण्यात आले.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे, "प्रांत" याच्या उल्लेखाऐवजी राज्याचे उल्लेख घालण्यात आले.

अतिरिक्त अर्धा दिवस बंद ठेवावयाचे किंवा सुटी द्यावयाची.

५. (१) राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, दुकाने किंवा दुकानांचा कोणताही विनिर्दिष्ट वर्ग यांच्या बाबतीत, कलम ३ द्वारा उपबंधित केलेल्या दिवसाव्यतिरिक्त आठवड्यातल्या आणखी एका दिवशी, [१][राज्य] शासन निश्चित करील अशा मध्यान्होत्तर वेळी ती बंद ठेवणे आवश्यक करू शकेल आणि थिएटरे आणि उपाहारगृहे किंवा त्यांपैकी एकाचा किंवा दोहोंचा कोणताही विनिर्दिष्ट वर्ग यांच्याबाबतीत, तेथे गौण्यविषयक कार्यपदावर नव्हे किंवा व्यवस्थापकीय पदावर नव्हे तर अन्यथा नोकरीला असलेल्या प्रत्येक व्यक्तीला प्रत्येक आठवड्यात राज्य शासन निश्चित करील अशा मध्यान्होत्तर वेळी सुरू होणारी अर्ध्या दिवसाची अतिरिक्त सुटी देण्यात येईल.

(२) राज्य शासन, या कलमाच्या प्रयोजनासाठी वेगवेगळ्या दुकानांसाठी किंवा दुकानांच्या वेगवेगळ्या वर्गांसाठी किंवा वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी किंवा वर्षातील वेगवेगळ्या वेळी वेगवेगळे तास नेमून देऊ शकेल.

(३) पोटकलम (१) खाली आवश्यक केल्यानुसार आठवड्यातील ज्या दिवशी दुकान बंद राहील तो दिवस, दुकानदार दुकानातील ठळक ठिकाणी कायम लावून ठेवलेल्या नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करील आणि दुकानदाराला तो दिवस तीन महिन्यांतून एकदा यापेक्षा अधिक वेळा बदलता येणार नाही.

वेतनात कोणतीही कपात किंवा घट करावयाची नाही.

६. जिला हा अधिनियम लागू होतो अशा आस्थापनेच्या नोकरीवर ठेवण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या वेतनामध्ये, एखाद्या दिवशी किंवा दिवसाच्या भागामध्ये आस्थापना बंद होती किंवा कलमे ३, ४ व ५ अनुसार सुटी देण्यात आली होती या कारणास्तव कोणतीही कपात किंवा घट केली जाणार नाही, आणि जर अशा व्यक्तीला अशा दिवसाचे किंवा दिवसाच्या भागाचे वेतन मिळणार नाही या तत्वावर नोकरीस ठेवण्यात आले असेल तर तिला, जर आस्थापना बंद नसती किंवा त्या दिवशी अथवा दिवसाच्या त्या भागात सुटी देण्यात आली नसती तर जेवढे वेतन मिळाले असते तेवढे वेतन काही झाले तरी देण्यात येईल.

निरीक्षक.

७. (१) [१][राज्य] शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, निरीक्षक म्हणून काही व्यक्तींची, राज्य शासन अशा प्रत्येक व्यक्तीला नेमून देईल अशा स्थानिक सीमांमध्ये नियुक्ती करता येईल.

(२) या कलमाखाली नियुक्त केलेला प्रत्येक निरीक्षक हा 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

निरीक्षकांच्या शक्ती.

८. (१) [१][राज्य] शासनाने याबाबत केलेल्या नियमांच्या अधीनतेने, निरीक्षकाला ज्या स्थानिक सीमांमध्ये त्याची नियुक्ती झालेली असेल तेथे,—

(क) जिला हा अधिनियम लागू असेल अशा आस्थापनेच्या ठिकाणी, त्याला योग्य वाटतील अशा, त्या [२][शासनाचे] कर्मचारी असलेल्या मदतनीसांसह प्रवेश करता येईल आणि थांबता येईल;

(ख) अशा कोणत्याही आस्थापनेची आणि कलम १०-पोटकलम (२)-खंड (ग) खाली केलेल्या नियमांनुसार तेथे ठेवण्यात आलेला कोणताही अभिलेख, नोंदवही किंवा नोटीस यांची तपासणी करता येईल आणि या अधिनियमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्याला आवश्यक वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीची जागच्या जागी किंवा अन्यत्र अशी साक्ष घेता येईल;

(ग) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर शक्तींचा वापर करता येईल.

(२) कलम १०—पोटकलम (२)-खंड (क) खाली केलेल्या नियमांनुसार ठेवलेला कोणताही अभिलेख, नोंदवही किंवा नोटीस जिच्या हवाली आहे अशी कोणतीही व्यक्ती, निरीक्षकाला आवश्यक वाटेल त्यावेळी ते सादर करण्यात बांधलेली असेल, पण एखाद्या व्यक्तीने एखाद्या प्रश्नाचे उत्तर दिल्यामुळे ती व्यक्ती स्वतःच प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या दंडनीय होण्याची शक्यता असेल तर त्या प्रश्नाचे उत्तर देण्याची तिच्यावर सक्ती केली जाणार नाही.

दंड.

९. कलम ३, कलम ४ यांचे उपबंध, कलम ५-पोटकलम (१) खालील अधिसूचनेद्वारे लादलेली आवश्यकता, कलम ६ किंवा कलम १०-पोटकलम (२)-खंड (ग) खाली केलेले नियम यांच्या उपबंधांचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण झाल्यास, असे व्यतिक्रमण जेथे घडेल त्या आस्थापनेचा मालक किंवा तिच्या व्यवस्थापनास जबाबदार असलेली अन्य व्यक्ती, पहिल्यांदा केलेल्या गुन्ह्याच्या बाबतीत पंचवीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या आणि दुसऱ्यांदा केलेल्या किंवा त्यानंतरच्या गुन्ह्याच्या बाबतीत अडीचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास पात्र असेल.

नियम.

१०. (१) [१][राज्य] शासनास या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पूर्वप्रकाशनाच्या शर्तींच्या अधीनतेने नियम करता येतील.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे, "प्रांतीय" याएवजी घालण्यात आले.

२. वरील आदेशाद्वारे "क्राऊन" याऐवजी घालण्यात आले.

(२) विशेषत: आणि पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमांद्वारे,—

(क) कलम ४ आणि ५ यांच्या प्रयोजनांसाठी कोणत्या व्यक्तींना गोप्यविषयक कार्यपदावर किंवा व्यवस्थापकीय पदावर नोकरीला असलेल्या व्यक्ती म्हणून मानण्यात येईल ते निश्चित करता येईल ;

(ख) निरीक्षकांनी आपल्या शक्ती वापरणे व आपली कर्तव्ये पार पाडणे याबाबत विनियमन करता येईल ;

(ग) ज्या आस्थापनांना ह्या अधिनियम लागू होतो तेथे नोंदवह्या व अभिलेख ठेवणे आणि नोटिसा लावणे या गोष्टी आवश्यक करता येतील आणि त्यांचा नमुना व मजकूर विहित करता येईल.

[1][(३) या अधिनियमान्वये राज्य शासनाने केलेला प्रत्येक नियम तो केल्यानंतर होईल तितक्या लवकर राज्य विधान मंडळासमोर ठेवण्यात येईल.]

**सूट देण्याची व निलंबित करण्याची शक्ती.**

११. केंद्र शासन, त्याच्या नियंत्रणाखाली असलेल्या आस्थापनांच्या बाबतीत, आणि [2][राज्य] शासन, [2][राज्यामधील] इतर सर्व आस्थापनांच्या बाबतीत, ज्या अटी लादणे त्याला योग्य वाटेल अशा कोणत्याही अटी असल्यास त्यांच्या अधीनतेने, ह्या अधिनियम लागू होणाऱ्या कोणत्याही आस्थापनेला या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही विनिर्दिष्ट उपबंधांमधून सूट देऊ शकेल आणि जत्रा किंवा उत्सव किंवा लागोपाठ येणाऱ्या सार्वजनिक सुट्या यांच्याशी संबंधित अशा कोणत्याही विशेष प्रसंगी या अधिनियमाचे प्रवर्तन विनिर्दिष्ट कालावधीपुरते निलंबित करू शकेल.

---

१. १९८६ चा अधिनियम ४, कलम २ द्वारे, समाविष्ट करण्यात आले.
२. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांत" याच्या उल्लेखाऐवजी "राज्य" याचे उल्लेख घातले.

## THE WEEKLY HOLIDAYS ACT, 1942

## आठवडी सुट्ट्या अधिनियम, १९४२

### इंग्रजी–मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| catalogue | कॅटलॉग | [S. 2 (d)] |
| class of public | लोकवर्ग | [S. 2 (c)] |
| criminate | दंडनीय करणे | [S. 8 (2)] |
| day | दिवस | [S. 2 (b)] |
| deduction or abatement | कपात किंवा घट | [S. 6-m.n.] |
| dramatic performances | नाट्यप्रयोग | [S. 2 (e)] |
| establishment | आस्थापना | [S. 2 (a)] |
| in a confidential capacity | गौप्यविषयक कार्यपदावर | [S. 2(4)] |
| in a position of manager | व्यवस्थापकीय पदावर | [S. 4] |
| moving pictures | चलच्चित्रपट | [S. 2 (e)] |
| principally or wholly | मुख्यत: किंवा पूर्णत: | [S. 2 (c)] |
| programmes | कार्यक्रमपत्रिका | [S. 2 (d)] |
| proprietor | मालक | [S. 9] |
| restaurant | उपाहारगृह | [S. 2 (c)] |
| retail trade or business | किरकोळ उदीम किंवा धंदा | [S. 2 (d)] |
| shop | दुकान | [S. 2 (d)] |
| stage entertainments | कलामंचावरील करमणुकीचे कार्यक्रम | [S. 2 (e)] |
| theatre | थिएटर | [S. 2 (e)] |
| weekly holidays | आठवडी सुट्या | [Long title] |

## आठवडी सुट्ट्या अधिनियम, १९४२

## THE WEEKLY HOLIDAYS ACT, 1942

### मराठी–इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| आठवडी सुट्या | weekly holidays | [दीर्घ शीर्षक] |
| आस्थापना | establishment | [क. २ (क)] |
| उपाहारगृह | restaurant | [क. २ (ङ)] |
| कपात किंवा घट | deduction or abatement | [क. ६-स. टी.] |
| कलामंचावरील करमणुकीचे कार्यक्रम | stage entertainments | [क. २ (ङ)] |
| कॅटलॉग | catalogue | [क. २ (घ)] |
| कार्यक्रमपत्रिका | programmes | [क. २ (घ)] |
| किरकोळ उदीम किंवा धंदा | retail trade or business | [क. २ (घ)] |
| गौप्यविषयक कार्यपदावर | in a confidential capacity | [क. २ (४)] |
| चलच्चित्रपट | moving pictures | [क. २ (ङ)] |
| थिएटर | theatre | [क. २ (ङ)] |
| दंडनीय करणे | criminate | [क. ८ (२)] |
| दिवस | day | [क. २ (ख)] |
| दुकान | shop | [क. २ (घ)] |
| नाट्यप्रयोग | dramatic performances | [क. २ (ङ)] |
| मालक | proprietor | [क. ९] |
| मुख्यत: किंवा पूर्णत: | principally or wholly | [क. २ (ग)] |
| लोकवर्ग | class of public | [क. २ (ग)] |
| व्यस्थापकीय पदावर | in a position of manager | [क. ४] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

एच ४२०३—२ (१०२६–४–९६)